## अंदाजपत्रक

मनपा/ नपा/नप /कटक मंडळाचे शिक्षण मंडळातील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनावरील होणा-या खर्चापोटी शासन त्यांना वेतन अनुदान देत असते . असे वेतन अनुदान वार्षिक किती लागेल याचा आगाऊ अंदाज शासनास सादर करणे आवश्यक असते. कारण त्याप्रमाणे शासनाला अशा खर्चासाठी अनुदान रुपातून तरतूद करावी लागते अशी तरतूद वेळेतच संबंधितांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने अंदाजपत्रक शासनास सादर होणे अत्यंत महत्वाचे असते. म्हणून प्रत्येक मनपा/ नपा/नप/कटक मंडळांच्या शिक्षण मंडळाकडून दरवर्षी चारमाही/आठमाही/ अकरामाही अंदाजपत्रक विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडून मा.शिक्षण संचालक यांना सादर केले जाते. त्याची पडताळणी करुन विभागाचे अंदाजपत्रकानुसार मा. शिक्षण संचालक. विभागीय शिक्षण उपसंचालक यांना तरतद ( वेतन अनुदान) उपलब्ध करुन देतात. विभागीय शिक्षण उपसंचालक त्याप्रमाणे सदर तरतूदीचे संबंधितांना वितरण करतात अंदाजपत्रक सादर करतांना कोणत्या महत्वाच्या बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे, तसेच अंदाज करतांना परिगणना कशी करावी याबाबतचे संचालनालयाचे सविस्तर परिपत्रक माहितीस्तव सोबत जोडले आहे. तसेच अंदाजपत्रक सादर करण्यासाठी आवश्यक असणारी/ लागणारी विवरणपत्र सोबत जोडली आहेत.

**कालमर्यादित**
**महत्वाचे**

क्रमांक प्राशिसं /२००९-१० / अ.मा.अ. /अंदाज २००(४)
प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे - १
दिनांक :- २-०२-२०१०

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे/मुंबई/नाशिक/कोल्हापूर/औरंगाबाद/
लातुर/अमरावती/नागपूर

**विषय :- प्राथमिक शिक्षण**
**सन २००९-१० मधील जमा / खर्चाचे अकरामाही सुधारित अंदाजपत्रक**
**"२२०२ सर्वसाधाण शिक्षण"**

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण २००९/९२५/प्र.क्र.१३७/नवि-२० मंत्रालय, मुंबई -३२, दि:- ३० जानेवारी २०१०

शासनाने सुधारित अंदाजपत्रक पाठविण्याकरिता विहित केलेल्या कार्यक्रमांनुसान सन २००९-१० या वर्षाचे अकरामाही सुधारित अंदाजपत्रकाची प्राप्त माहिती संकलित करुन संचालनालयामार्फत शासनास सादर करावयाची आहे. सुधारित अंदाजपत्रक सादर करण्याबाबत पुढे दिलेल्या सूचना लक्षात घेऊन सन २००९-१० करीता अकरामाही सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.

हे अत्यंत महत्वाचे अंदाजपत्रक असल्याने ते काटेकोरपणे व काळजीपूर्वक तयार करणे आवश्यक आहे. आपण केलेल्या अंदाजा वरच पूरक मागण्याचा प्रस्ताव विधान सभेत सादर करावयाचा असतो या करीता यापूर्वी आपणास वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना सदर अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी विचारात घ्याव्यात त्यासाठी काही महत्वाच्या सूचना खाली देण्यात येत आहेत.

राज्यातील प्राधिकृत महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषदा /कटक शिक्षण मंडळे यांनी आधिच्या वर्षी केलेल्या मान्य खर्चावर शासन अनुदान देत असते. सदर अनुदान मंजूर करताना त्यासाठी अंदाजपत्रकात आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. सदरची तरतूद ही सन २००९-१० च्या अकरामाही अंदाजपत्रकात तरतूद करण्यासाठी सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये भरुन अकरामाही अंदाजपत्रक संचालनालयास वेळापत्रकानुसार सादर करण्यात यावे.

**१) वेतन :-** योजनेतर योजने खाली मंजूर झालेल्या पदांची संख्या अचूकपणे दर्शविण्यात यावी. मंजूर पदे, त्यापैकी भरलेली पदे, रिक्त पदे याची माहिती देण्यात यावी. वेतन या उद्दीष्टासाठी महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषदा /कटक शिक्षण मंडळे यांच्या वर्गवारीनुसारच अंदाजपत्रक सादर करावे, आवश्यक असणारी (कमी/जादा) तरतूद मिळविण्यासाठी आवश्यक त्या समर्थनासह सादर करणे गरजेचे आहे. प्राथमिक शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या आठमाही अंदाजपत्रकाचे वेळी दिलेल्या संख्येशी सुसंगत असावी. कमी जास्त झाल्यास त्याची कारणे द्यावीत.

**२) वेतनेतर :-** राज्यातील प्राधिकृत महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषदा /कटक शिक्षण मंडळे तसेच नगरपालिका क्षेत्रातील १०० टक्के अनुदानित खाजगीप्राथमिक शाळांना कार्यालयीन खर्चासाठी वेतनेतर अनुदान योजनेतर योजना सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सांमजस्य करारानुसार वेतनेतर अनुदान सन २००३-०४ पर्यंत अनुज्ञेय आहे त्यानंतर वेतनेतर अनुदान देय नाही. सन २००९-१० ची अर्थसंकल्पिय होणारी रक्कम सन २००४-०५ पूर्वीच्या वेतनेतर थकबाकीसाठी वापरावयाची आहे या साठी सन २००४-०५ पूर्वी असणाऱ्या थकबाकीची माहिती वर्ष निहाय, नगरपालिका निहाय सोबतच्या विवरणपत्रामध्ये देण्यात यावी.

**३) शासन निर्णय क्र.** (१) शासन अधिसुचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर १२०९/ प्र. क्र. २७ / सेवा -९ दि. २२.४.२००९
(२) शासन परिपत्रक क्रमांक वेपुर /१२०९/ प्र.क्र.-६९ / सेवा -९, दि. २९ एप्रिल २००९

अन्वये ६ वा वेतन आयोग लागू झाल्याने त्यानुसार जादा लागणा-या तरतूदीची १ जाने २००९ ते जून २००९ पर्यंतची एकूण देय व नियमित वेतनाची वाढ जुलै २००९ ते फ्रेब्रुवारी २०१० पर्यंत देय तरतूदी धरुनच अंदापत्रक दयावे

४ शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतनाबाबतचे विवरणपत्र आणि सेवानिवृत्ती धारक शिक्षक/ शिक्षकांचे सेवानिवृत्ती वेतन दोन तक्ते स्वतंत्रपणे दिलेले आहेत या दोन्ही विवरणपत्रांचा एकत्रित गोषवारा सोबतचे विवरणपत्रात नमूद करावा

५ सन २००९-१० चे अकरामाही अंदाजपत्रक सादर करतांना सर्व संबंधित कार्यालयांनी एप्रिल २००९ ते फ्रेब्रु २०१० अखेरचे मासिक खर्च अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करावेत शिक्षण उपसंचालक यांनी सदर अहवाल संकलित करुन संचालनलयास सादर करावेत

संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक प्राशिस २००६-०७ परिपत्रक २०० ४ दिनांक १६.९.२००६ अन्वये मासिक खर्च अहवाल सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या विहीत नमून्यामध्ये मासिक खर्च सादर करण्यांत यावा

६ खर्चावर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने निर्गमित केलेल्या सूचना या संचालनालयाचे पत्र क्रमांक प्राशिसं खर्चनि २०० ६ १५६४० दिनांक ९.११.२००६ चे पत्रान्वये आपणांस पाठविण्यांत आल्या आहेत.

७ नियमित सेवानिवृत्ती वेतन/ कुटुंब निवृत्ती वेतन धारकांच्या शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नावांची यादी व या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त होणारे कर्मचारी यांच्या नावांची यादी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात आणावी

८. विभागाचे एकत्रित अकरामाही अंदाजपत्रक आपलया कार्यातील संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी दिलेल्या विहीत मुदतीतच समक्ष सादर करावे

९. सन २००८-०९ चे आपल्या अखत्यारितील सर्व मनपा/नपा/ नगरपरिषदा/ कटक शिक्षण मंडळे यांचे अनुदान निर्धारण अहवाल सोबत आणावेत अनुदान निर्धारण अहवाल प्राप्त न झाल्यास पुढील अनुदान वितरीत केले जाणार नाही

१० ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती करुन जदा अनुदानाची मागणी केल्यास दिनांक ३१.३.२०१० पर्यंत सर्व रक्कम खर्ची पडेल याची खात्री करुनच मागणी करावी तदनंतर रक्कम सर्मर्पित केली जाणार नाही याची नोंद घ्यावी .

सही/ शिक्षण संचालक प्राथमिक

-----------------------------------------------------------------

# विवरण पत्र - १

## सन २००९-१० अकरामाही सुधारित अंदाजपत्रक

कार्यालयाचे नांव : वेतन खर्च (रुपये हजारांत)

| अ.क्र. | रवर्चाचा प्रकार | लाभार्थी संख्या २००९-१० | प्रत्यक्ष खर्च २००८-०९ | अर्थसंकल्पिय तरतूद २००९-२०१० | प्रत्यक्ष खर्च १.४.२००९ ते २८.०२.२०१० | संभाव्य खर्च १.०३.२०१० ते ३१.३.२०१० | एकूण खर्च २००९-१० स्तंभ ६+७ | (+) जादा (-)कमी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | मुळ वेतन (मार्च २००९ देय एप्रिल २००९ या एका महिन्याचे ) | | | | | | | |
| २ | पे बॅन्ड मधील वेतन (एप्रिल २००९ ते फेब्रुवारी २०१० या कालावधीसाठी ६ व्या वेतन आयोगानुसार ) | | | | | | | |
| ३ | सुधारित वेतनश्रेणीनुसार देय ग्रेड पे ( एप्रिल २००९ ते फेब्रुवारी २०१० या ११ महिन्यासाठी ) | | | | | | | |
| ४ | महागाई भत्ता मूळ वेतन + महागाई वेतनाच्या ५४ % दराने (मार्च २००९ चे एप्रिल २००९ मध्ये देय असलेल्या एका महिन्यासाठी ) | | | | | | | |
| | भत्ता वरील अ.क्र.२ .३ च्या २२% दराने (एप्रिल २००९ ते जुन २००९ या ३ महिन्यासाठी) आणि जुलै २००९ ते फेब्रुवारी २०१० : २७ % दराने | | | | | | | |
| | **एकूण महागाई भत्ता** | | | | | | | |
| ५ | घर भाडे भत्ता मूळ वेतन + महागाई वेतनावर प्रचलित दराने | | | | | | | |
| ६ | शहर पुरक भत्ता +महागाई वेतनावर प्रचलित दराने | | | | | | | |
| ७ | वाहतूक भत्ता | | | | | | | |
| ८ | प्रोत्साहन भत्ता / लाभार्थी | | | | | | | |
| ९ | शिक्षण सेवकाचे मानधन (लाभार्थी) | | | | | | | |
| १० | लिपिक / शिपाई मानधन /लाभार्थी | | | | | | | |
| | एकूण नियमित वेतन | | | | | | | |
| ११ | ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन श्रेणीनुसार (जानेवारी २००६ ते मार्च २००९ या ३९ महिन्याचा वेतनाच्या फरकाची रक्कम ) | | | | | | | |
| १२ | १२ वर्ष कालबध्द पदोन्नती भार / लाभार्थी | | | | | | | |
| १३ | रजा प्रवास सवलत भार/लाभार्थी | | | | | | | |
| १४ | वैधकिय प्रतिपूर्ती/ (लाभार्थी) | | | | | | | |
| १५ | रजा रोखीकरण/लाभार्थी | | | | | | | |
| १६ | इतर व थकित (बाब निहाय सविस्तर स्वतंत्र माहिती द्यावी.) | | | | | | | |
| | एकूण वेतन | | | | | | | |

**विवरणत्र क्रमांक दोन**

**अकरामाही सुधारित अंदाजपत्रक २००९ - २०१० कार्यालयीन खर्चाचा तपशील**

कार्यालयाचे नांव :- **(वेतनेतर अनुदान )** (रुपये हजारात )

| अ. क्र. | कार्यालयीन अंतर्गत खर्चाची बाब | प्रत्यक्ष खर्च २००७ - २००८ | अर्थसंकल्पिय अंदाज २००८ - २००९ | प्रत्यक्ष खर्च १.४.२००९ ते ३१.७.२००९ | संभाव्य खर्च दि.१.८.२००९ ते ३१.३.२००१० | एकूण खर्च (५+६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | विद्युत खर्च | | | | | |
| २ | दूरध्वनी खर्च | | | | | |
| ३ | पाणीपट्टी खर्च | | | | | |
| ४ | गॅस खर्च | | | | | |
| ५ | उष्ण व शीत हवामान विषयक खर्च | | | | | |
| ६ | वाचनालय | | | | | |
| ७ | लेखनसामग्री | | | | | |
| ८ | प्रयोग शाळा | | | | | |
| ९ | कार्यालयीन यंत्रांची व उपकरणांची खरेदी आणि परिरक्षण | | | | | |
| १० | टपाल खर्च | | | | | |
| ११ | फर्निचर खरेदी | | | | | |
| १२ | फर्निचर दुरुस्ती | | | | | |
| १३ | नमुने छपाई | | | | | |
| १४ | वाहनांचे परिरक्षण (वाहनांची संख्या नमूद करावी) | | | | | |
| १५ | इंधन खर्च | | | | | |
| १६ | इतर खर्च | | | | | |
| | **एकूण** | | | | | |

**विवरण पत्र क्रमांक तीन**

**अकरामाही सुधारित अंदाजपत्रक २००९ - २०१०**

प्राथमिक शिक्षकांच्या सेवानिवृत्ती वेतनविषयी द्यावयाची माहिती विवरणपत्र

**सेवानिवृत्ती वेतन**

कार्यालयाचे नांव : (रुपये हजारात )

| अ. क्र. | तपशील | अंतिम सुधारीत तरतुद २००८ - २००९ | प्रत्यक्ष खर्च २००८-२००९ | अर्थसंकल्पिय अंदाज २००९-२०१० | उपलब्ध करुन दिलेली रोख तरतुद २००९-२०१० | प्रत्यक्ष खर्च १.४.२००९ ते २८.०२.२०१० | संभाव्य खर्च १.०३.२०१० ते ३१.३२०१० | एकूण रक्कम (७+८) | अधिक (+) बचत (-) | लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | नियमित सेवानिवृत्ती वेतनाचा खर्च | | | | | | | | | |
| २ | कुटुंब निवृत्ती वेतन | | | | | | | | | |
| ३ | सेवानिवृत्ती मृत्यु-नि-सेवाउपदान | | | | | | | | | |
| ४ | अंशराशीकरण | | | | | | | | | |
| ५ | थकबाकी | | | | | | | | | |
| | **एकूण** | | | | | | | | | |

## इतर माहिती :

| | | |
|---|---|---|
| १ | **३१.३.२०१०** पर्यंतचे कुटुंब निवृत्ती वेतन घेणारे लाभार्थी | |
| | (+) नियमित सेवानिवृत्ती वेतन घेणारे शिक्षक | |
| | **एकून लाभार्थी** | |
| २ | १ एप्रिल, २००९ ते ३१ मार्च २०१० अखेर सेवानिवृत्त होणारे शिक्षक | |
| ३ | पाचव्या वेतन आयोगानुसार दि. १.१.९६ पुर्वी सेवानिवृत्ती झालेले शिक्षक | |
| ४ | पाचव्या वेतन आयोगानुसार दि. १.१.९६ ते ३०.६.९९ पर्यंत निवृत्त झालेले शिक्षक | |

**विवरणपत्र क्रमांक चार**

**अकरामाही सुधारित अंदाजपत्रक २००९ - २०१०**

**महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद / कटक शिक्षण मंडळे या बाबतचा**

**गोषवारा**

**(योजनेत्तर योजना - २२०२०२०८ )** **(रुपये हजारात)**

| अ.क्र. | तपशिल | प्रत्यक्ष खर्च २००८-२००९ | संचालनालयाकडून आत्ता पर्यंत अदा केलीली रक्कम | प्रत्यक्ष खर्च १.४.२००९ ते २८.०२.२०१० | संभाव्य खर्च १.०३.२०१० ते ३१.३.२०१० | एकूण रकाना (५+६) | अधिक(+) बचत(-) | पुढील हत्यासाठी लागणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | वेतन | | | | | | | |
| ३ | सेवा निवृत्ती वेतन | | | | | | | |
| | एकूण वेतन | | | | | | | |

**टिप :- १) वेतना बाबतची सविस्तर माहिती विवरण पत्र मध्ये द्यावी .**

**२) वेतनेत्तर अनुदानाची सविस्तर माहिती विवरण पत्र मध्ये द्यावी .**

**विवरणपत्र क्रमांक पाच**

**अकरामाही सुधारित अंदाजपत्रक २००९ - २०१०**

**महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद / कटक शिक्षण मंडळे**

| अ. क्र. | शिक्षण मंडळाचे नांव | वर्गवारी | टक्केवारी | शाळा संख्या | मान्य पदे | | | कार्यरत पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शिक्षक | शिक्षकेतर | एकूण | शिक्षक | शिक्षकेतर | एकूण |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | |

**महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद / कटक शिक्षण मंडळे कार्यक्षेत्रातील १०० टक्के अनुदानित खाजगी प्राथमिक शाळा**

| अ. क्र. | शिक्षण मंडळाचे नांव | वर्गवारी | टक्केवारी | शाळा संख्या | मान्य पदे | | | कार्यपत पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शिक्षक | शिक्षकेतर | एकूण | शिक्षक | शिक्षकेतर | एकूण |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | |

**विवरणपत्र क्रमांक सात**

**अकरामाही सुधारित अंदाजपत्रक २००९ - २०१०**

**वर्गवारीनुसार महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद / कटक शिक्षण मंडळे यांचा हिस्सा**

| सन २००८ - २००९ मनपा/ नपा हिस्सा | सन २००९ - १० मनपा / नपा कडून प्राप्त रक्कम | सन २००९ - १० मनपा / नपा कडून हिस्सा म्हणून वसूल करावयाची रक्कम | सन २००८ - ०९ या वर्षा पूर्वीची रक्कम वसूल करावयाची आहे काय असल्यास तपशील द्यावा | रक्कम वसूल न करण्याची कामे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**विवरणपत्र क्रमांक आठ**

**जमा रकमेचे अकरामाही सुधारित अंदाजपत्रक २००९ - २०१०**

| अ. क्र. | जमेची बाब | २००७-०८ मध्ये झालेली प्रत्यक्ष जमा | १.४.२००९ ते २८.०२.२०१० पर्यंत जमा | १.०३.२०१० ते ३१.३.२०१० पर्यंत अपेक्षित जमा | एकूण जमा रक्कम (४+५) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | शिक्षण शुल्क | | | | | |
| २ | परीक्षा शुल्क | | | | | |
| ३ | इतर शुल्क तपशीलासह | | | | | |
| ४ | इतर जमा | | | | | |
| अ | जादा वेतनाची वसूली | | | | | |
| ब | रजा वेतन | | | | | |
| क | भंगार माल, रद्दी याची विक्री यापासून उत्पन्न | | | | | |
| ५ | अंशदाने व दान निधी | | | | | |

## विवरण पत्र- ३

जिल्हा

| अ.क्र. | पदनाम | सुधारीत वेतनश्रेणी | सुधारित वेतनश्रेणीनपुसार अनुज्ञेय ग्रेड पे | एकूण पदांची संख्या | | | सुधारित वेतन बॅण्ड मधील वेतनासाठी लागणारी रक्कम | ग्रेड पे साठी लागणरी रक्कम | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भरलेली | रिक्त | एकूण मंजूर पदे | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | मुख्याधापक (वरिष्ठश्रेणी) | ९३००-३४८०० | ४४०० | | | | | | |
| २ | मुख्याधापक | ९३००-३४८०० | ४३०० | | | | | | |
| ३ | पदवीधर प्राथमिक शिक्षण वरिष्ठश्रेणी | ९३००-३४८०० | ४४०० | | | | | | |
| ४ | प्राथमिक शिक्षक (पदवीधर) | ९३००-३४८०० | ४३०० | | | | | | |
| ६ | सहाय्यक शिक्षक (निवडश्रेणी | ९३००-३४८०० | ४३०० | | | | | | |
| ७ | सहाय्यक शिक्षक (वरिष्ठ श्रेणी) | ९३००-३४८०० | ४२०० | | | | | | |
| ८ | प्रशिक्षित सहाय्यक शिक्षक | ५२००-२०२०० | २८०० | | | | | | |
| ९ | अप्रशिक्षित सहाय्यक शिक्षक | ५२००-२०२०० | २००० | | | | | | |
| १० | शिक्षण सेवक | ३०००/- प्रतिमहा | | | | | | | |
| | **एकूण शिक्षक** | | | | | | | | |
| ११ | वरिष्ट लिपिक | ५२००-२०२०० | २४०० | | | | | | |
| १२ | कनिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | १९०० | | | | | | |
| १३ | कनिष्ठ लिपिक (मानधनावर) | २०००/-प्रतिमहा | | | | | | | |
| १४ | सेवक (वरिष्ठश्रेणी) | ४४४०-७४४० | १६०० | | | | | | |
| | सेवक | ४४४०-७४४० | १३०० | | | | | | |
| १५ | सेवक | १७००/- प्रतिमहा | | | | | | | |
| | **एकूण शिक्षकेतर** | | | | | | | | |
| | **एकूण (शिक्षक/शिक्षकेतर)** | | | | | | | | |

**महानगरपालिकेचे नांवः**

(रक्कम हजारात)

| अ.क्र. | वर्ष | प्राथमि संचालनालयाकडून वितरित केलेले अंतिम तरतुद | | एकूण प्राप्त तरतूद | एकूण प्रत्यक्ष खर्च | जादा/कमी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतन | वेतनेतर | | | |
| १ | २००४-०५ | | | | | |
| २ | २००५-०६ | | | | | |
| ३ | २००६-०७ | | | | | |
| ४ | २००७-०८ | | | | | |
| ५ | २००८-०९ | | | | | |

**लेखाशीर्ष - २२०२०२०८**

(रक्कम रु. हजारात)

| अ.क्र. | योजना | मंजुर तरतूद | पुरवणी मागणीद्वारे मंजूर तरतूद | एकूण उपलब्ध तरतूद | जानेवारी २०१० अखेर संभाव्य खर्च | मार्च २०१० अखेर संभाव्य खर्च | एकूण खर्च | (+) जादा (-) कमी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | खाजगी प्राथमिक शाळा | ७६३०५१२ | १४७९६५२ | ९११०१६४ | ७२८९६९७ | १८२०४६७ | ९११०१६४ | |
| २ | महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषद | ४७५७५९८ | १३०९३२ | ४८८८५३० | ३८८४७५० | १००३७८० | ४८८८५३० | |
| | **एकूण** | **१२३८८११०** | **१६१०५८४** | **१३९९८६९४** | **१११७४४४७** | **२८२४२४७** | **१३९९८६९४** | |

वरील विवरणपत्रामध्ये महानगरपालिका/ नगरपालिका / नगरपरिषद/ कटक मंडळे यांनी आपल्या कार्यालयाची माहिती भरुन शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडे सादर करावी . याप्रमाणेच अंदाजपत्रकाच्या अन्य विवरणपत्रामध्ये माहिती भरुन शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयाकडे माहिती सादर करावी. व प्रत्येक विवरणपत्राच्या खाली आपल्या पदनामाचा शिक्का उमटवून त्यावर आपली स्वाक्षरी करावी. सदरचे अंदाजपत्रक ११ माहीचे असून चारमाही/ आठमाहीच्या अंदाजपत्रकामध्ये आवश्यक त्या ठिकाणी महिना व तारखेत बदल करावा.

**लेखाशीर्ष - २२०२०१९१**

(रक्कम रु. हजारात)

| अ.क्र. | योजना | मंजुर तरतूद | पुरवणी मागणीद्वारे मंजूर तरतूद | एकूण उपलब्ध तरतूद | जानेवारी २०१० अखेर संभाव्य खर्च | मार्च २०१० अखेर संभाव्य खर्च | एकूण खर्च | (+) जादा (-) कमी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका | | | | | | | |
| | वेतन | ९३१७६८ | ० | ९३१७६८ | ० | ३२३८९२ | ३२३८९२ | -६०७८७६ |
| | वेतनेतर | ३८०० | ० | ३८०० | ० | ३८०० | ३८०० | ० |
| | **एकूण** | **९३५५६८** | **०** | **९३५५६८** | **०** | **३२७६९२** | **३२७६९२** | **-६०७८७६** |